# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः10.04.2024** **वारःबुधवार**

---

1. लोकसभा निवडणुकीसाठी महाविकास आघाडीचं जागावाटप जाहीर,
2. शिवसेना उद्धव ठाकरे पक्ष 21, काँग्रेस 17 आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष 10 जागांवर लढणार
3. महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचा महायुतीला बिनशर्त पाठिंबा; राज ठाकरे यांची गुढी पाडवा मेळाव्यात घोषणा
4. गेल्या लोकसभा निवडणुकीच्या तुलनेत यंदा राज्यात 2 हजार 641 मतदान केंद्रांची वाढ; सर्वाधिक मतदान केंद्र पुण्यात
5. राज्यात गुढी पाडव्याचा सण उत्साहात साजरा आणि
6. राज्याच्या विविध भागात वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसाची हजेरी

**<u>मविआ-मुंबई</u>**

आगामी लोकसभा निवडणुकांसाठी महाराष्ट्रात महाविकास आघाडीनं जागावाटप काल जाहीर केलं. त्यानुसार शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष 21, काँग्रेस 17 आणि राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष 10 मतदारंघात उमेदवार उभे करणार आहे. महाविकास आघाडीच्या संयुक्त पत्रकार परिषदेत काल जागावाटपाबाबत घोषणा करण्यात आली. मुंबईत दक्षिण- मध्य, वायव्य, दक्षिण आणि ईशान्य मुंबई अशा 4 जागांवर शिवसेना तर उत्तर आणि उत्तरमध्य अशा 2 जागांवर काँग्रेस लढणार आहे. नंदुरबार, धुळे, अकोला, अमरावती, नागपूर, भंडारा-गोंदिया, गडचिरोली-चिमूर, चंद्रपूर, नांदेड, जालना, पुणे, लातूर, सोलापूर, कोल्हापुर, रामटेक अशा एकंदर 17 जागा काँग्रेस लढणार आहे. राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष बारामती, शिरुर, सातारा, भिवंडी, दिंडोरी, माढा, रावेर, वर्धा, अहमदनगर आणि बीड या जागांवर लढणार आहे. शिवसेना मुंबईच्या चार जागांबरोबरच जळगाव, परभणी, नाशिक, पालघर, कल्याण, ठाणे, रायगड, मावळ, रत्नागिरी, बुलडाणा, हातकणंगले, छत्रपती संभाजीनगर, शिर्डी, सांगली, हिंगोली, यवतमाळ-वाशिम, धारशिव या जागा लढवणार आहे. सर्व घटक पक्ष एकत्र लढून विजय मिळवतील, असा विश्वास यावेळी सर्वच पक्षाच्या नेत्यांनी व्यक्त केला. यावेळी शरद पवार, उद्धव ठाकरे, नाना पटोले, बाळासाहेब थोरात, जयंत पाटील, शेकापचे जयंत पाटील, शिक्षक नेते कपिल पाटील यांच्यासह विविध नेते उपस्थित होते.

**<u>उमेदवार-सांगली</u>**

महाविकास विकास आघाडीनं सांगली लोकसभेची उमेदवारी पैलवान चंद्रहार पाटील यांना जाहीर केली आहे. आमदार विश्वजीत कदम आणि आमदार विक्रम सावंत यांनी सांगलीची जागा काँग्रेसलाच मिळावी यासाठी प्रयत्न केले होते. हा निर्णय अनपेक्षित असल्याची भावना काँग्रेस कार्यकर्त्यांनी व्यक्त केल्याचं आमच्या वार्ताहरानं कळवलं आहे.

**<u>मनसे</u>**

महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे अध्यक्ष राज ठाकरे यांनी काल महायुतीला बिनशर्त पाठिंबा जाहीर केला. मुंबईत झालेल्या गुढी पाडवा मेळाव्यात ते बोलत होते. राज ठाकरे आणि वरिष्ठ भाजपा नेते अमित शहा यांच्या दिल्लीतील भेटीनंतर ठाकरे काय भूमिका घेणार याकडे राज्याचं लक्ष होतं. काल अखेर राज ठाकरे यांनी आपली भूमिका स्पष्ट केली. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या कणखर नेतृत्वासाठी मी भाजपा, शिवसेना, राष्ट्रवादी यांना बिनशर्त पाठिंबा देत आहे असं राज ठाकरेंनी जाहीर केलं. ही लोकसभा निवडणूक लढवणार नसल्याचंही त्यांनी स्पष्ट केलं असून विधानसभेच्या तयारीला लागा, असा आदेश त्यांनी मनसे कार्यकर्त्यांना दिला आहे.

**<u>मतदान केंद्र संख्या</u>**

येत्या लोकसभा निवडणुकीसाठी राज्यात 2 हजार 641 नवीन मतदान केंद्रे वाढली आहेत. यावेळी राज्यात 98 हजार 114 मतदान केंद्रे असणार आहेत. मतदारांची नोंदणी सुरु असल्याने या मतदार केंद्रांमध्ये वाढ होण्याची शक्यता आहे. सर्वांत जास्त मतदान केंद्रे यावेळी पुण्यात असून त्याची संख्या 8 हजार 382 आहे. सर्वांत कमी मतदान केंद्रे सिंधुदुर्ग आणि गडचिरोलीमध्ये आहेत. सिंधुदुर्गमध्ये 918 आणि गडचिरोलीमध्ये 950 मतदान केंद्रे असणार आहेत. 7 जिल्हयात 3000पेक्षा जास्त मतदान केंद्रे आहेत. तर 10 जिल्हयांत 2000 हून अधिक मतदान केंद्रे आहेत. 2000 पेक्षा जास्त मतदान केंद्रे 10 जिल्हयात आहेत. तर 2000 पेक्षा कमी मतदान केंद्रे 12 जिल्ह्यात आहेत. मतदान केंद्राबाबतचे सर्व निकष भारत निवडणूक आयोगामार्फत ठरविण्यात येत असून मतदार केंद्रांची 'संवेदनशीलता' बघून त्याठिकाणी आवश्यक सुरक्षा पुरविण्यात येते. केंद्रीय निवडणूक आयोगाने जारी केलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार प्रत्येक मतदान केंद्रावर किमान मूलभूत सुविधा असणे बंधनकारक आहे. दुर्गम भागात असलेल्या मतदान केंद्रांवर विशेष काळजी घेण्यात येणार आहे.

**<u>गुढीपाडवा</u>**

चैत्र शुद्ध प्रतिपदा अर्थात गुढीपाडवा हा सण काल राज्यात सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. घरोघरी, मंदिरांमध्ये, तसंच सार्वजनिक ठिकाणी उभारलेल्या गुढ्या, भव्य रांगोळ्या, फुलांची आकर्षक तोरणं आणि हिंदू नववर्ष दिनाच्या स्वागतासाठी निघालेल्या मिरवणुका असं वातावरण जवळजवळ सर्वच गावाशहरात होतं. सराफी पेढ्या; तसंच इलेक्ट्रॉनिक्स वस्तू, चारचाकी आणि दुचाकी वाहनांच्या बाजारपेठांमध्येही  काल उत्साहाचं वातावरण होतं. या निमित्तानं राज्याच्या विविध भागात झालेल्या उपक्रमांचा हा वृत्तांत....

**पुणे, मुंबई, ठाण्यासह अनेक शहरांमध्ये काल नववर्ष स्वागतयात्रा काढण्यात आली. गिरगावमधल्या स्वामी विवेकानंद युवा प्रतिष्ठानच्या नववर्ष मिरवणुकीची मध्यवर्ती संकल्पना रामराज्य आणि शिवराज्य अशी होती. ठाण्यात झालेल्या मिरवणुकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदेही सहभागी झाले होते. धारावीमध्ये धारावी विकासाची' गुढी उभारून अनोखा सोहळा साजरा झाला. दादरमध्ये भारत मंथन फाऊंडेशनद्वारे अथर्वशीर्ष आणि रामरक्षा पठण करण्यात आलं. शिर्डीच्या साईबाबा संस्थान इथंही विधिवत पूजा करून मंदिराच्या कळसावर गुढी उभारण्यात आली. कोल्हापूरमध्ये करवीर निवासिनी श्री अंबाबाई देवीची सालंकृत पूजा बांधण्यात आली होती. देवीच्या समोर हापूस आंब्याच्या राशी लावण्यात आल्या होत्या. सांगलीमध्ये रोटरी क्लबनं सूर पहाटेचे हा संगीतमय कार्यक्रम आयोजित केला. रत्नागिरीमध्ये ग्रामदैवत भैरी मंदिरापासून पतितपावन मंदिरापर्यंत स्वागत यात्रा काढण्यात आली. आरोग्य, व्यायाम, रस्त्यावरची सुरक्षितता, प्लास्टिकमुक्ती आदींबद्दल जनजागृती करणारे रथ या यात्रेत सहभागी झाले होते. लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नव वर्ष स्वागत यात्रांमधून मतदान करण्याचं आवाहनही अनेक ठिकाणी करण्यात आलं. परभणीमध्ये मतदानाची गुढी उभारण्यात आली होती. नाशिकमध्ये 21 ठिकाणहून नव वर्ष स्वागत यात्रा काढण्यात आल्या. याद्वारे मतदानाबाबत जागृती आणि बेटी बचाव देश बचाव चा संदेश देण्यात आला. अहमदनगर, बीड, धुळे, अकोला यासह राज्यातल्या बहुतांश भागात गुढी पाडव्यानिमित्त सामाजिक, सांस्कृतिक उपक्रमांचं आयोजन करण्यात आलं होतं. आकाशवाणी बातम्यांसाठी आमच्या ठीकठिकाणच्या वार्ताहरांसह पुण्याहून प्रशांत जाधव.**

**<u>भुईबावडा घाट-सिंधुदुर्ग</u>**

सिंधुदुर्ग आणि कोल्हापूर या दोन जिल्ह्यांना जोडणाऱ्या भुईबावडा घाटात निसर्ग सौंदर्यासोबतच आता आजूबाजूच्या परिसरातली जैवविविधता चित्रांच्या स्वरूपात अनुभवता येणार आहे. ऐकुया याबाबत अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून.....

**सार्वजनिक बांधकाम विभागाचे मुख्य कार्यकारी अभियंता अजयकुमार सर्वगोड, वैभववाडी उपविभागीय अधिकारी विनायक जोशी आणि कनिष्ठ अभियंता शुभम दुडिये यांच्या संकल्पनेतून भुईबावडा घाटातल्या रस्त्यालगतच्या दगडांवर वाघ, बिबट्या, गवा, कोल्हे, खवले मांजर, मुंगूस, माकड, अजगर अशा वेगवेगळ्या प्राण्यांची वॉल पेंटिंग्ज रेखाटण्यात**

**आलीत. महाराष्ट्रातला पहिला पर्यटन जिल्हा असलेल्या सिंधुदुर्ग जिल्ह्यात येणाऱ्या पर्यटकांना निसर्ग आणि वन्य जीवांचं सौंदर्य अनुभवता यावं, वन्य प्राण्यांची ओळख व्हावी आणि मुख्य म्हणजे त्यांचं संवर्धन व्हावं हा यामागचा विभागाचा उद्देश आहे. कुडाळच्या ओरिगो डिझाईन स्टुडिओच्या कलाकारांनी आपल्या चित्रकलेच्या माध्यमातून प्राण्यांची हुबेहूब चित्रं साकारत या दगडांना जणू काही जिवंतच केलंय. अशाप्रकारची ही संकल्पना सिंधुदुर्ग जिल्ह्यात पहिल्यांदाच राबवण्यात आली असून यामुळे प्रवाशांना आणि पर्यटकांना आनंद मिळेल हे नक्की! आकाशवाणी बातम्यांसाठी सिंधुदुर्गहून निलेश जोशी.**

**पाऊस-बुलडाणा, सोलापूर, अकोला, लातूर**

राज्याच्या विविध भागात काल वादळी वाऱ्यासह पाऊस पडला. बुलडणा जिल्ह्यात खामगाव,शेगांव, संग्रामपूरसह अनेक तालुक्यात झालेल्या पावसामुळे भाजीपाला पिकाचं मोठं नुकसान झालं. काही ठिकाणी वृक्ष उन्मळून पडल्याने जनावरे दगावण्याच्या घटना घडल्या आहेत. सोलापूर शहर आणि जिल्ह्यात गेल्या आठ ते दहा दिवसांपासून तापमानाचा पारा चांगलाच चढला होता. काल काहीशी तापमानात घट होऊन संध्याकाळी जिल्ह्यातील काही भागात आवकाळी पाऊस पडला. लातूर शहर आणि परिसरात तसंच हिंगोली जिल्ह्यातही काल वादळी वाऱ्यासह अवकाळी पावसानं हजेरी लावली. त्यामुळे उकाड्याने हैराण झालेल्या नागरिकांना दिलासा मिळाला. अकोला जिल्ह्यात अवकाळी पावसामुळे आंबा आणि अन्य फळपिकांचं नुकसान झालं आहे.

**हवामान**

मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात आजपासून पुढील चार दिवस वादळी वारे आणि वीजांसह हलका ते मध्यम स्वरुपाचा पाऊस पडण्याचा इशारा हवामान विभागानं दिला आहे. विदर्भातही 13 तारखेपर्यंत अशाच पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं; नमस्कार.